# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. ११/०३/२००८

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक ११/०३/२००८ रोजी सभा सुचना क्र. १२ दि. ०३/०३/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | ॲड. एस.ए. खान | -- | सदस्य |
| ३) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| ४) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ५) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ६) | सौ. नयना गजानन म्हात्रे | -- | सदस्या |
| ७) | श्री. गणेश गोपाळ शेटटी | -- | सदस्य |
| ८) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| ९) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| १०) | श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल | -- | सदस्य |
| ११) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |
| १२) | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | -- | सदस्या |
| १३) | श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे | -- | सदस्य |
| १४) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| १५) | श्री. राजु भोईर | -- | सदस्य |

## रजेचा अर्ज

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |

**मा. सभापती :-**

आजच्या सभेला उपस्थित सर्व सन्मा. सदस्य/सदस्या, उपस्थित अधिकारी/कर्मचारी वर्ग, आजच्या सभेला मी आपणा सर्वांचे स्वागत करुन आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडण्यासाठी आपण सर्व सहकार्य कराल अशी आशा बाळगतो. सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

यासुचनेव्दारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. ११/०३/२००८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादूर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १२, दि. ३/३/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता ही सभा स्थगित करा आणि सगळे अधिकारी आल्याशिवाय सभा सुरु करायची नाही. आम्ही चालू देणार नाही.

**मा. सभापती :-**

दुसऱ्या आठवड्यापर्यंत सभेला स्थगिती देतो.

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता ही स्थगिती दिली. पण आलेले नाहीत त्यांचे काय?

**मा. सभापती :-**

त्यांना उत्तर द्यावे लागेल.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही त्यांना नोटीस काढा. जे डिपार्टमेंटचे प्रमुख गैरहजर आहेत. त्यांना सचिव कार्यालयातून नोटीस कधी गेले आहे?

**मा. सभापती :-**

श्री. खतगांवकर साहेब सर्वांना नोटीस काढा.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांना ५६ ची नोटीस काढायची. ही चौथी मिटींग झाली.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

स्टॅण्डींगमध्ये धोरण आहे की, जे विषय असतील ते अधिकारी बसतात.

**मिलन म्हात्रे :-**

हे धोरण कोणी ठरवले?

**मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

मा. आयुक्तांनी लेखी पत्र दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ते मा. आयुक्तांचे अधिकार नाहीत की, या स्टँण्डींगला कोणी बसायचे आणि कोणी बसायचे नाही. काहीतरी वाटेल तसे कायद्याचे नियम तुम्ही स्वतःहून तयार करु नका. श्री. आर. डी. शिंदे यांनी आम्हांला स्टॅण्डींगला पत्र दिले? आम्ही लोक प्रतिनिधी आहेत. कोणी आयुक्त येतील त्यांची लायकी नसते.

**मा. सभापती :-**

मी आत्ता सांगतो की, सर्व अधिकारी पाहिजेत. कारण आपण इकडे असल्यावर हा अधिकारी नाही त्याला बोलावयाला पाठवा.

**मिलन म्हात्रे :-**

कोण आयुक्त? तिकडे एन.डी. झोनमध्ये बंगले झाले आहेत. तुमच्या श्री. घेवारेंनी आयुक्तांच्या बंगल्याला एन.डी. झोनमध्ये परवानगी दिली आहे, ते आयुक्त शेतकऱ्यांना कंपाउंड वॉलची परवानगी नाकारणारे आयुक्त. स्वतःचे बंगले एन.डी. झोनमध्ये घेउन बसले आहेत.तुम्ही कुठल्या आयुक्तांची गोष्ट करता. आम्ही इकडे मिटींगला आमचा वेळ खराब करुन येतो. आम्हांला प्रत्येक डिपार्टमेंटची माणसे पाहिजेत. एक तर दोन दोन विषयांवर मिटींग लागते. आम्ही आमचे उद्योगधंदे सोडून मिटींगला यायचे. एकही अधिकारी मिटींगला हजर नाही. नोटीसांचे काय झाले?

**प्रशांत पालांडे :-**

मा.सभापती साहेब दोन विषय आहेत. आम्ही पण आमचा वेळ काढून आलेलो आहोत. पुढच्या वेळेपासून दक्षता घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब पुढच्या आठवडयापर्यंत स्थगिती दिलेली आहे. त्यापेक्षा तुम्ही अर्धा एक तास गॅप करा आणि परत घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

मी तुम्हांला मिटींग कायमची स्थगित करायला सांगितलेले नाही. तुम्ही दहा मिनिटांकरिता किंवा अर्ध्या तासाकरिता करु शकता. मा. आयुक्तांनी कुठल्या अधिकाराने सर्व डिपार्टमेंटला पत्र दिले की, तुम्ही हजर राहायचे नाही. आज विधी अधिकारी प्रत्येक मिटींगला हजर पाहिजे.

**एस. ए. खान :-**

मा. सभापतींनी सांगितले की, याच्यापुढे आले नाहीत तर ५६ ची नोटीस काढणार.

**मिलन म्हात्रे :-**

तुमची प्रत्येक गोष्ट आर्थिक विभागाशी निगडीत पाहिजे. लेखा विभागाची माणसे इकडे मिटींग संपेपर्यंत हजर पाहिजेत. मी दोन वर्ष मा. स्थायी समितीचा सदस्य होतो.

**एस. ए. खान :-**

यापुढे सगळे डी.एम.सी. सगळे वॉर्ड ऑफीसर सगळे पाहिजेत.

**प्रशांत पालांडे :-**

पुढच्या मिटींगपासून दक्षता घ्या. सगळे अधिकारी पाहिजेत. आजचे दोन विषय करुन घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब आत्ता स्थगित करा. अधिकाऱ्यांना बोलावून घ्या. आपण परत बसू.

**मिलन म्हात्रे :-**

कोणीही अधिकारी येतो. काहीही पत्र काढतो. कोणाचे अधिकार खेचतो. परत संध्याकाळी देतो. हे काय चालले आहे. किराणा मालाचा बाजार चालला आहे काय?

**मा. सभापती :-**

विषयाचा प्रश्न नाही. पाच मिनिटाचे विषय असतात. परंतु इथे कोणीच उपस्थित नव्हते म्हणून मला स्थगित करावे लागते.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही त्यांना नोटीस काढा. तुम्ही आजच्या नोटीसचे रुलिंग द्या. तुम्ही मिटींग स्थगित करा. त्यांना ५६ ची नोटीस काढा.

**मा. सभापती :-**

सभा तहकुब करित आहे असे जाहिर करतो.

**सभा तहकुब झाल्याची वेळ :- सकाळी ११.१० वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**